Subject Code **J-310**

Seat No. | | | | | | | |

M

DATE : 29/06/2026

Time : 11.00 - 2.00

SUBJECT : BOOK KEEPING AND ACCOUNTANCY (50)

DURATION : 3 Hours   TOTAL PAGES : 10   TOTAL MARKS : 80

प्र. १. **सर्व उपप्रश्न अनिवार्य आहेत :** **२०**

(अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून संपूर्ण वाक्य पुन्हा लिहा : (५)

(i) .... ही अदृश्य संपत्ती आहे.

(अ) ख्याती (ब) स्कंध

(क) रोख (ड) फर्निचर

(ii) उत्पन्नाचे खर्चावरील आधिक्य म्हणजे .... होय.

(अ) तूट (ब) नफा

(क) वाढावा (ड) तोटा

(iii) संपत्तीच्या मूल्यात घट होते तेव्हा पुनर्मूल्यांकन खाते .... केले जाते.

(अ) नावे (ब) जमा

(क) समान (ड) अधिक

(iv) नोंदणी अधिकारी .... असतो.

(अ) सरकारी अधिकारी (ब) पृष्ठांकिती

(क) आदाता (ड) आहर्ता

(v) कायम ठेव खाते .... या गटात मोडते.

(अ) गुंतवणूक (ब) बँक खाते

(क) चल देयता (ड) चल संपत्ती

(ब) खालील विधानांसाठी एक शब्द / शब्द समूह / संज्ञा लिहा : (५)

(i) असा खर्च जो देय असण्यापूर्वीच केला जातो.

(ii) अशी प्राप्ती जी आवर्ती स्वरूपाची नसते.

(iii) भागीदारी प्रवेशामध्ये जुन्या भागीदारांना सामान्य निधीचे वाटप करावयाचे प्रमाण.

(iv) भागीदारीचा व्यवसाय संपुष्टात येणे.

(v) भागांचे दर्शनी मूल्यांकन निर्गमन.

(क) खालील विधाने पूर्ण करा : (५)

(i) भागीदारी संस्थेमधील भागीदाराची देयता .... असते.

(ii) पुणे विद्यापीठ हे नफा-तोटा खाते ऐवजी .... खाते तयार करते.

(iii) जी व्यक्ती विपत्र काढते त्यास .... म्हणतात.

(iv) पुनर्मूल्यांकन खात्याला .... खाते असेही म्हणतात.

(v) चल अनुपात = $\dfrac{\text{...............}}{\text{चल देयता}}$

(ड) खालील विधानांशी तुम्ही सहमत आहात की असहमत आहात ते लिहा : (५)

(i) मोफत वाटलेला माल व्यापार खात्याला नावे दर्शविला जातो.

(ii) नफा न मिळविणे हा अव्यावसायिक संस्थेचा हेतू असतो.

(iii) ख्यातीचे अपलेखन करतेवेळी ख्याती खाते नावे करतात.

(iv) भागीदारी संस्थेच्या विसर्जनाच्या वेळी रोख / बँक खाते आपोआप बंद होते.

(v) मृत भागीदाराचा संस्थेतील ख्यातीवर हक्क / अधिकार नसतो.

प्र. २. **कौस्तुभ आणि केतन हे नफा-तोटा १ : १ या प्रमाणात वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांचा ३१ मार्च, २०२३ रोजीचा ताळेबंद खालील प्रमाणे होता :** **१०**

ताळेबंद पत्रक ३१ मार्च २०२३ रोजीचा

देयता	रक्कम (₹)	संपत्ती	रक्कम (₹)
भांडवल :		इमारत	१,२०,०००
कौस्तुभ	२,००,०००	यंत्रसामुग्री	१,४०,०००
केतन	२,८०,०००	गुंतवणूक	४८,०००
धनको	६८,०००	ऋणको	५२,०००
देय विपत्र	५२,०००	स्कंध	८०,०००
		रोकड	१,६०,०००
	६,००,०००		**६,००,०००**

१ एप्रिल, २०२३ रोजी प्रणवला $\frac{१}{५}$ हिश्श्यासाठी, भविष्यातील नफ्यात, खालील अटींवर प्रवेश दिला :

(i) संस्थेच्या ख्यातीचे मूल्य ₹ ४,००,००० करण्यात आले. प्रणवने त्याचा हिस्सा रोख आणावयाचा आहे.

(ii) प्रणवने भांडवल म्हणून ₹ २,००,००० आणावे.

(iii) संशयित कर्ज निधीसाठी ऋणकोवर १०% तरतूद करावी.

(iv) इमारतीचे मूल्य ₹ १,६०,००० करावे.

(v) स्कंध आणि यंत्रसामुग्रीचे मूल्य २०% ने कमी करावे.

तयार करा (अ) पुनर्मूल्यांकन खाते

(ब) भागीदारांचे भांडवल खाते

(क) नवीन संस्थेचा ताळेबंद

किंवा

समान प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे सागर, सूरज आणि साहिल यांचा ताळेबंद खालील प्रमाणे आहे :

ताळेबंद ३१ मार्च २०२३ रोजीचा

देयता	रक्कम (₹)	संपत्ती		रक्कम (₹)
भांडवल :		इमारत		१,४०,०००
सागर	८७,२००	यंत्रसामुग्री		२०,०००
सूरज	७०,०००	संगणक		३५,०००
साहिल	६४,०००	ख्याती		२४,०००
राखीव निधी	२७,०००	ऋणको	३६,०००	
धनको	६१,८००	वजा सं.क.नि.	१,८००	३४,२००
		बँक		५६,८००
	३,१०,०००			**३,१०,०००**

१ एप्रिल, २०२३ रोजी साहिल खालील अटींवर व्यवसायातून निवृत्त झाला :

(i) यंत्रसामुग्रीचे पुनर्मूल्यांकन ₹ १८,८०० करावे.

(ii) इमारतीचे मूल्य १०% ने वाढवावे आणि संगणकाचे मूल्य ₹ ३,८०० ने कमी करावे.

(iii) संपूर्ण ऋणको शोध्य असून यापुढे संशयित कर्जनिधीची गरज नाही.

(iv) संस्थेच्या ख्यातीचे मूल्य ₹ ३६,००० निश्चित करावे.

(v) साहिलला द्यावयाची रक्कम त्याच्या कर्जखात्याला स्थानांतरित करावी.

तयार करा :

(अ) नफा-तोटा समायोजन खाते

(ब) भागीदारांचे भांडवल खाते

(क) नवीन संस्थेचा ताळेबंद

प्र. ३. **मे. भूमी, भूपाळ आणि बिपिन यांच्या भागीदारीच्या ३१ मार्च, २०२३ रोजीचा ताळेबंद खालील प्रमाणे आहे :** **१०**

ताळेबंद पत्रक ३१ मार्च २०२३ रोजीचा

देयता	रक्कम (₹)	संपत्ती	रक्कम (₹)
भांडवल :		संगणक	११,०००
भूमी	१५,०००	उपस्कर	४५,०००
भूपाळ	११,०००	स्कंध	५३,०००
भूमीचे कर्ज खाते	२५,०००	बँक	७,०००
देय विपत्र	८५,०००	बिपिनचे भांडवल खाते	२०,०००
	१,३६,०००		**१,३६,०००**

देयतांचे शोधन करण्यास सर्व भागीदार असमर्थ आहेत त्यामुळे भागीदारी संस्था विसर्जित करण्यात आली. भूपाळ आणि बिपिन यांनी काहीही शोधन केलेले नाही. भूमीच्या खाजगी संपत्तीतून केवळ ₹ ८,००० वसूल झाले.

संपत्तीचे रोखीकरण :

स्कंध ₹ ३५,०००, उपस्कर ₹ ३७,०००, संगणक ₹ ६,००० ला विकण्यात आले.

रोखीकरण खर्च ₹ ११,००० करण्यात आला.

संस्थेची हिशोबाची पुस्तके बंद करण्यासाठी आवश्यक खाती तयार करा.

किंवा

सुरेखाने सुमनला ₹ २०,००० च्या मालाची उधारीवर विक्री केली. त्याच दिवशी सुमनने ३ महिने मुदतीच्या विपत्राला स्वीकृती दिली. त्याच दिवशी सुरेखाने ते विपत्र आपल्या बँकेत वार्षिक १०% दराने वटविले.

विपत्राच्या देय दिनांकाच्या दिवशी सुमनने सुरेखाला विनंती केली की, ₹ ८,००० व व्याजाचे ₹ १,००० रोख घ्यावे बाकी रकमेसाठी २ महिने मुदतीचे विपत्र काढावे. सुरेखाने सुमनचा प्रस्ताव मान्य केला.

नवीन विपत्राच्या देय दिनांकापूर्वी सुमनने आपल्या स्वीकृत विपत्राचे ₹ ११,८०० वर निवर्तन केले.

सुरेखाच्या पुस्तकात आवश्यक किर्दनोंदी द्या.

प्र. ४. प्रविण, प्रशांत आणि सुशील हे भागीदार असून अनुक्रमे ५:३:२ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च, २०२२ रोजीचा ताळेबंद खालील प्रमाणे होता : ८

ताळेबंद ३१ मार्च २०२२ रोजीचा

देयता	रक्कम (₹)	संपत्ती	रक्कम (₹)
भांडवल :		सुटी अवजारे	१,००,०००
प्रविण	२,००,०००	ऋणको	३,००,०००
प्रशांत	१,५०,०००	पशुधन (livestock)	२,००,०००
सुशील	१,००,०००	रोख	१,५०,०००
राखीव निधी	५०,०००		
धनको	२,५०,०००		
	७,५०,०००		**७,५०,०००**

दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी सुशीलचा मृत्यू झाला. म्हणून भागीदारी करारानुसार खालील समायोजना करण्यात आल्या :

(i) धनकोमध्ये ₹ २०,००० ची वाढ करण्यात आली.

(ii) ख्यातीचे आगणन संस्थेच्या मागील तीन वर्षांच्या सरासरी नफ्याच्या दुप्पट, खरेदीनुसार करण्यात यावे.

मागील तीन वर्षांचा नफा खालील प्रमाणे

२०१९-२० ₹ १,८०,०००

२०२०-२१ ₹ १,२०,०००

२०२१-२२ ₹ १,२०,००० (तोटा)

यातील सुशीलचा हिस्सा त्याला देण्यात यावा.

(iii) सुटी अवजारे आणि पशुधनाचे पुनर्मूल्यांकन अनुक्रमे ₹ १,६०,००० आणि ₹ २,४०,००० करण्यात आले.

(iv) संशयित व बुडीत कर्ज निधी ₹ २०,००० ठेवण्यात आला.

तयार करा :

(अ) पुनर्मूल्यांकन खाते

(ब) सुशीलच्या भांडवल खात्यात त्याच्या वारसाला दिली जाणारी रक्कम दाखविण्यात यावी.

(क) सुशीलच्या ख्यातीचे कृती कार्य दर्शवा.

किंवा

संगणकीय लेखांकन प्रणालीचे महत्त्व स्पष्ट करा.

प्र. ५. फिनोलेक्स कंपनी लिमिटेडने प्रत्येकी ₹ १० चे ५०,००० समभाग विक्रीस काढून त्याकरिता अर्ज आमंत्रित केले. त्यावर पुढील प्रमाणे प्रतिभाग रक्कम देय आहे. ८

₹ ३ अर्जा सोबत

₹ ५ आवंटनावर

₹ २ प्रथम आणि अंतिम याचनेवर

६०,००० समभागांकरिता अर्ज आले. त्या सर्वांना अनुपातिक प्रमाणामध्ये वाटप करण्यात आले. राहुलने धारण केलेल्या ५,००० समभागांवरील प्रथम आणि अंतिम हप्ता मागणी सोडून अन्य सर्व भागांवरील येणे असलेली संपूर्ण रक्कम मिळाली.

वरील व्यवहाराच्या नोंदी रोजकीर्द पुस्तकात करा.

किंवा

खालील माहितीच्या आधारे चल अनुपात, सकल लाभ अनुपात आणि शुद्ध नफा अनुपाताची गणना करा :

ऋणको	२,५०,०००
धनको	१,२०,०००
स्कंध	१,५०,०००
देय विपत्र	५०,०००
हातातील रोख	२,००,०००
अधिकोष अधिविकर्ष	३०,०००
शुद्ध विक्री	१६,००,०००
सकल नफा	८,००,०००
शुद्ध नफा	४,००,०००

प्र. ६. **१ एप्रिल, २०२२ रोजी नव्याने स्थापन झालेल्या अथर्व आर्ट सर्कल, सिंधुदुर्ग यांचे प्राप्ती शोधन खाते पुढील प्रमाणे :** **१२**

प्राप्ति-शोधन खाते

३१ मार्च २०२३ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता

प्राप्ती	**रक्कम (₹)**	**शोधन**	**रक्कम (₹)**
आजीवन सभासद शुल्क	६६,०००	फर्निचर	३६,०००
वर्गणी	१,२०,०००	पोस्टेज	१२,०००
देणगी	५४,०००	कार्यालय भाडे	७,८००
		वर्तमानपत्रे	९००
		विद्युत खर्च	१,६८०
		गुंतवणूक	९,०००
		स्टेशनरी	१२,०००
		लॅपटॉप	१८,०००

		संयंत्र	२०,०००
		वेतन	१०,०००
		शिल्लक (पुढे नेली)	
		हस्तस्थ रोख	२२,६२०
		बँक शिल्लक	९०,०००
	२,४०,०००		२,४०,०००

समायोजना :

(i) २०२२-२३ या वर्षाची अप्राप्त वर्गणी ₹ १५,००० आहे.

(ii) फर्निचरवर वार्षिक १०% दराने घसारा आकारा.

(iii) आजीवन सभासद शुल्काच्या संपूर्ण रकमेचे आणि देणगीच्या ५०% रकमेचे भांडवलीकरण करा.

३१ मार्च, २०२३ वर्षाकरिता उत्पन्न खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

प्र. ७. जयेश आणि रूपेश ३ : २ प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. खालील परीक्षासूची आणि समायोजनावरून ३१ मार्च, २०२३ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार आणि नफा-तोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा : १२

परीक्षा-सूची

३१ मार्च २०२३ रोजीची

नावे शिल्लक	रक्कम (₹)	जमा शिल्लक	रक्कम (₹)
खरेदी	१,६३,०००	विक्री	२,२०,०००
ऋणको	४५,०००	धनको	४७,०००
सामान्य खर्च	८,०००	खरेदी परत	३,०००

स्कंध (१/४/२२)	३५,०००	भांडवल :	
परिसर	१,३०,०००	जयेश	१,२०,०००
भाडे (१० महिन्या-करिता)	२०,०००	रूपेश	८०,०००
उत्पादक मजुरी	५,०००		
उपस्कर (१/१०/२२ ला ₹ २०,०००ची वाढ)	४०,०००		
बँकेतील रोख	२४,०००		
	४,७०,०००		४,७०,०००

समायोजना :

(i) संवरण स्कंध ₹ ३८,०००

(ii) उपस्करावर वार्षिक १०% दराने घसारा.

(iii) भांडवलावर वार्षिक ५% व्याज आकारा.

(iv) ₹ २,००० चा माल नमुना म्हणून मोफत वाटण्यात आला.

◆◆◆